पीकपाणी

# अशी करा कोथिंबिरीची लागवड

प्रा. पल्लवी घुले
प्रा. डी.व्ही मोरे
(फळशास्त्रविभाग)
प्रा. संदीप विधाते
(भाजीपालाशास्त्र विभाग)
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक





कोथिंबिरीची लागवड करण्याआधी जमीन नांगरून व कुळवून चांगली भुसभुशीत करून घ्यावी. जमिनीत एकरी ६ ते ८ टन चांगले कुजलेले शेणखत घालावे. त्यानंतर ३ बाय २ मीटर आकाराचे सपाट वाफे तयार करावे. आपण या वाफ्यांत बी फेकून लागवड करू शकतो. या प्रकारे लागवड करताना बी सारखे पडेल याची काळजी घ्यावी. बी फेकून लागवड करायची नसेल तर वाफ्यामध्ये १५ सें.मी. अंतरावर खुरप्याने ओळी पाडून त्यात बी पेरू शकतो.

कोथिंबिरीला वर्षभर मागणी असते. त्यामुळे व्यवस्थित नियोजनाने कोथिंबीर लागवड करून हमखास असा नफा मिळवता येतो. या लेखामधून कोथिंबीर लागवडीबद्दल



माहिती दिली आहे.

कोथिंबिरीचा वापर हा घरात, हॉटेलमध्ये, लग्नसमारंभ व इतर कार्यक्रमात जेवण बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत असल्याने कोथिंबिरीला वर्षभर चांगली मागणी असते. कोथिंबिरीची लागवड ही प्रामुख्याने पावसाळी (खरीप) व हिवाळी (रब्बी) हंगामात केली जाते. उन्हाळ्यामध्ये उत्पन्न कमी निघत असले तरी मागणी प्रचंड असल्याने बाजारात चांगला भाव मिळतो. त्यामुळे बरेच शेतकरी उन्हाळ्यात देखील कोथिंबीर लागवड करतात.

**जमीन** : कोथिंबीरीच्या लागवडीसाठी मध्यम कसदार आणि मध्यम खोलीची जमीन योग्य असते. परंतु जमिनीत सेंद्रिय खते जास्त प्रमाणात असतील तर हलक्या किंवा भारी कसदार असलेल्या जमिनीत देखील कोथिंबीर लागवड करू शकतो.



**हवामान** : तसे पाहता कोथिंबिरीची लागवड ही कोणत्याही हवामानात करू शकतो. परंतु अतिपाऊस किंवा अतिऊन असेल तर कोथिंबिरीची वाढ हवी तशी होत नाही.

आधी सांगितल्याप्रमाणे उन्हाळ्यात कोथिंबिरीची वाढ कमी असते पण मागणी जास्त असल्याने बाजारात भाव चांगला असतो त्यामुळे पाण्याची उपलब्धता असेल तर उन्हाळ्यात देखील कोथिंबीर लागवड करून जास्त नफा मिळवता येतो.

**लागवड पध्दत** : कोथिंबिरीची लागवड करण्याआधी जमीन नांगरून व कुळवून चांगली भुसभुशीत करून घ्यावी. जमिनीत एकरी ६ ते ८ टन चांगले कुजलेले शेणखत घालावे. त्यानंतर ३ बाय २ मीटर आकाराचे सपाट वाफे तयार करावे. आपण या वाफ्यांत बी फेकून लागवड करू शकतो. या प्रकारे लागवड करताना बी सारखे पडेल याची काळजी घ्यावी. बी फेकून लागवड करायची नसेल तर वाफ्यामध्ये १५ सें.मी. अंतरावर खुरप्याने ओळी पाडून त्यात बी पेरु शकतो.

उन्हाळ्यात लागवड करायची असेल तर पेरणीआधीच वाफे भिजवा आणि मग वाफसा आल्यानंतर त्यात बी फेकून किंवा ओळी पाडून त्यात बी टाकून पेरणी करावी. लागवडीसाठी एकरी २५ ते ३५ किलो बियाणे लागते. लागवडीआधी धने हळुवार रगडून फोडून घ्यावेत व त्यातील बी वेगळे करावे तसेच पेरणीपूर्वी धण्याचे बी भिजवून मग गोणपाटात गुंडाळून ठेवावे. त्यामुळे उगवण ८ ते १० दिवसांत होते व कोथिंबिरीच्या उत्पादनात वाढ होते. त्याचसोबत काढणी देखील लवकर होते.

**सुधारित जाती** : व्ही १, व्ही २, को-१, डी-९२, डी-९४, जे २१४, के ४५, कोइमतूर-१, कोइमतूर-२, लाम सी.एस.-२, लाम सी.एस.- ४, स्थानिक वाण, जळगाव धना, वाई धना या स्थानिक आणि सुधारित जाती लागवडीसाठी वापरल्या जातात.

**खत व पाणी व्यवस्थापन** : लागवडीआधी जमिनीत एकरी ६ ते ८ टन चांगले कुजलेले शेणखत घालावे. बी उगवल्यानंतर २० दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. त्याचसोबत २५ दिवसांनी १०० लिटर पाण्यात २५० ग्रॅम युरिया मिसळून दोन फवारण्या करू शकतो, ज्यामुळे कोथिंबिरीची वाढ चांगली होते.

पिकाला नियमित पाणी गरजेचे असते. उन्हाळ्यात दर ५ दिवसांनी तर हिवाळ्यात ८-१० दिवसांनी पाणी द्यावे.

**कीड व रोग** : कोथिंबीर पिकावर रोग व किडीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो. कधी कधी मर, भुरी या रोगांचा प्रार्दुभाव दिसतो. अशावेळी शिफारशीनुसार भुरी रोगासाठी भुरी प्रतिबंधक वापरू शकतो तसेच पाण्यात विरघळणारे गंधक वापरावे.

**काढणी व उत्पादन** : पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी कोथिंबीर १५ ते २० सें.मी. उंचीची होते त्यावेळी ती उपटून किंवा कापून काढणी करावी. पेरणीच्या दोन महिन्यांनंतर कोथिंबिरीला फुले यायला सुरवात होते त्यामुळे त्याआधीच काढणी करणे महत्त्वाचे आहे. पावसाळी आणि हिवाळी हंगामात हिरव्या कोथिंबिरीचे एकरी ४ ते ६ टन उत्पादन मिळते तर उन्हाळी हंगामात हेच उत्पादन २.५ ते ३.५ टन मिळते. ■